
Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक
# जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

।मंगळवार, दि. १४ एप्रिल २०२६ । वर्ष १ ।अंक ६ ।पाने २।
DIGITAL EDITION




» Selected

## कर्नाटक राजकारणात मोठा भूकंप?

नवी दिल्ली : गेल्या काही महिन्यांपासून कर्नाटकात मोठ्या राजकीय घडामोडी पाहायला मिळत आहेत. मुख्यमंत्री पदावरून काँग्रेसमधील वाद काही दिवसांपूर्वी चव्हाट्यावर आला होता. कर्नाटक सरकारमधील काही आमदारांनी नवी दिल्लीत जाऊन काँग्रेसच्या हायकमांडची भेट घेतली होती आणि उपमुख्यमंत्री डी.के. शिवकुमार यांना मुख्यमंत्री करण्याची मागणी करण्यात आल्याचं बोललं जात होतं. मात्र, काँग्रेस हायकमांडने या चर्चा फेटाळून लावल्या होत्या. त्यानंतर आता पुन्हा एकदा कर्नाटकात राजकीय घडामोडींना वेग आला आहे. कर्नाटक सरकारमधील जवळपास ३० काँग्रेस आमदार बंडाच्या तयारीत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. ३० आमदार एकत्र मिळून तातडीने दिल्लीला रवाना झाल्याची सांगितली जात आहे. हे ३० आमदार एकत्र मिळून काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि राहुल गांधी यांची भेट घेण्याची शक्यता आहे. या संदर्भातील वृत्त एएनआयने दिलं आहे.

### आमच्यात हस्तक्षेप करू नका, ड्रॅगनचा ट्रम्प यांना थेट इशारा

# होर्मुझ नाकेबंदीला चीनचा विरोध

## चीनसाठी होर्मुझ समुद्रमार्ग अत्यंत महत्वाचा

जन सम्राट टाईम्स

नवी दिल्ली : अमेरिकेने इराणला कोंडीत पकडण्यासाठी जागतिक व्यापाराच्या दृष्टीने महत्वाच्या असणाऱ्या होर्मुझ सामुद्रधुनीवर नाकेबंदी करण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. या नाकेबंदीमुळे जागतिक तेल, गॅस व्यापाराला मोठा फटका बसणार आहे. चीनने मात्र अमेरिकेच्या नाकेबंदीच्या विरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. "चीन आणि इराणमध्ये व्यापारी करार आहेत. कोणीही चीनच्या द्विपक्षीय संबंधांमध्ये हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न करु नये", असा इशाराच चीनने अमेरिकेला आहे. आज रात्री साडे सात वाजता मुदत समाप्तीनंतर अमेरिकेने होर्मुझ सामुद्रधुनीत नाकेबंदी करण्यास सुरुवात केली आहे. यानंतर



काही वेळातच चीनकडून अमेरिकेला इशारा देण्यात आला आहे. चीनचे संरक्षण मंत्री ॲडमिरल डोंग जून यांनी नाकेबंदीविरोधात अमेरिकेला इशारा दिला आहे. "आमचे इराणबरोबर व्यापार आणि उर्जासंबधित करार आहेत. आमच्या या संबंधात इतर कोणीही हस्तक्षेप करु नये", असा स्पष्ट इशारा डोंग जून यांनी दिला आहे.चीनसाठी समुद्रमार्ग अत्यंत महत्वाचा मानला जातो. यामार्गातून इराणला जवळपास ४० टक्के इंधन पुरवठा आणि ३० टक्के एलएनजी पुरवठा केला जातो. यामुळेच चीन अमेरिका – इस्रायलविरुद्ध इराण युद्धात युद्धविरामाची मागणी करत होते. यामागे समुद्रमार्ग सुरक्षित ठेवणे हा त्यांचा उद्देश होता. आंतरराष्ट्रीय समुदायासाठी समुद्रमार्ग सुरक्षित ठेवणे अत्यंत महत्वाचे असल्याचे मत चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाने मांडले होते. इराणमध्ये सुरु असलेल्या संघर्षामुळे समुद्रमार्गात अडथळा निर्माण झाल्याचे चीन ओळखून होता त्यामुळे युद्धविरामासाठी त्यांच्याकडून हालचाली सुरु होत्या.अमेरिका – इस्रायल यांचा इराणविरुद्ध सुरु असलेला संघर्ष समाप्त करण्यासाठी चीनकडून नेहमीच सकारात्मक भूमिका घेण्यात आली. युद्धविरामासाठी त्यांच्याकडून हालचाली सुरु होत्या. दरम्यान, डोनाल्ड ट्रम्प यांनी रविवारी होर्मुझ सामुद्रधुनीवर नाकेबंदी करण्याचे जाहीर केले. सामुद्रधुनीत प्रवेश करणारे आणि बाहेर पडणाऱ्या जहाजांना रोखले जाईल, असे ट्रम्प यांनी स्पष्ट केले. यासाठी आज रात्री ७.३० वाजेपर्यंत मुदत देण्यात आली होती.

### अमेरिकेकडून नाकेबंदी

दरम्यान, मुदत समाप्त होताच अमेरिकेने होर्मुझ सामुद्रधुनीत नाकेबंदी करण्यास सुरुवात केली आहे. इराणची सर्व नौदल जवळपास समाप्त झाले आहे. पण, काही कमी धोक्याची जहाजं शिल्लक आहेत, या जहाजांनी नाकेबंदीच्या जवळपास येण्याचा प्रयत्न केल्यास त्यांना नष्ट केले जाईल, असा इशारा ट्रम्प यांनी दिला आहे. ट्रम्प यांनी ठरल्याप्रमाणे नाकेबंदी केली असून, आता चीन काय भूमिका घेणार याकडे जगाचे लक्ष लागले आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज ज

# अ. जा उपवर्गीकरणाबाबत निवेदनास मुदतवाढ!

## ३० एप्रिल पर्यंत या मेलवर पाठवता येतील निवेदने

जन सम्राट टाईम्स

**मुंबई** : राज्यातील अनुसूचित जातींच्या आरक्षणाचे अ, ब, क, ड या धर्तीवर उपवर्गीकरणाच्या अनुषंगाने निवेदन किंवा अर्ज सादर करण्यासाठी ३० एप्रिल २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे, अशी माहिती राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी दिली सोमवारी दिली. अनुसूचित जातीच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्यासंदर्भात न्यायमूर्ती अनंत मनोहर बदर (निवृत्त न्यायाधीश, उच्च न्यायालय, पाटणा) यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त एक सदस्यीय समितीने दिनांक १६ मार्च २०२६ रोजी अहवाल शासनास सादर केला आहे. या अहवालावर आक्षेप, मते व निवेदन मागविणे तसेच त्यावर सुनावणी घेण्यासाठी शासन निर्णय १० एप्रिल २०२६ अन्वये राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीसमोर मते, आक्षेप इच्छुकांना ई-मेलद्वारे नोंदणी करण्याकरिता यापूर्वी १५ एप्रिल २०२६ पर्यंत मुदत देण्यात आली होती. मात्र ही मुदत अत्यंत अल्प असल्याची टीका मोठ्या प्रमाणात झाली होती. त्यानुसार, संबंधितांना आपले आक्षेप किंवा मते सादर करण्यासाठीची अंतिम मुदत आता ३० एप्रिल २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे. अनुसूचित जातीच्या आरक्षणाच्या उपवर्गीकरणाबाबत ज्यांना अर्ज, निवेदने द्यावयाची आहेत, अशा इच्छुकांनी DG-SW@BARTI.IN या ई-मेल आयडीवर आपले निवेदन किंवा अर्ज सादर करावेत, असे आवाहन राज्याच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने केले आहे. न्या. बदर यांचा अहवाल सार्वजनिक न करता निवेदने व अर्ज कसे काय मागवता? असा प्रश्न आंबेडकरी विचारवंतांनी राज्य शासनाला केला आहे. अनुसूचित जातीमध्ये संवर्गामध्ये ५९ जाती आहेत.



### फूट पाडण्याचा आरोप

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेने अनुसूचित जातीच्या अरक्षणाच्या उपवर्गीकरणाबाबत अभ्यास अहवाल २०२३ मध्ये राज्य शासनाला सादर केला आहे. त्या अहवालाच्या आधारे शासन उपवर्गीकरण करू इच्छित आहे. मात्र हा अहवाल मातंग समाजातील कार्यकर्त्यांनी तयार केला आहे. सरकारला अनुसूचित जातींमध्ये फूट पाडून भांडणे लावायची आहेत, असा आरोप आंबेडकरी चळवळीतून होत आहे.

# प्रफुल्ल-साकिबचं स्वप्नवत पदार्पण!

## हैदराबादचा राजस्थानवर दिमाखदार विजय

जन सम्राट टाईम्स

**मुंबई** : इशान किशनच्या नेतृत्त्वाखालील सनरायझर्स हैदराबाद संघाने राजस्थान रॉयल्सवर ५७ धावांनी दणदणीत विजय मिळवला. या विजयासह हैदराबाद संघाने राजस्थानचा विजयी रथ रोखला. भारताच्या देशांतर्गत क्रिकेटमधील दोन तारे या सामन्यात हैदराबादकडून झळकले. प्रफुल हिंगे व साकिब हुसैन यांनी या पदार्पणाच्या सामन्यातच हैदराबादसाठी तारणहार ठरले. दोघांनीही ४-४ विकेट्स घेत राजस्थानच्या फलंदाजीला सुरूंग लावला. सनरायझर्स हैदराबादने प्रथम फलंदाजी करताना या सामन्याक २० षटकांत ६ बाद २१६ धावांची खेळी केली. यानंतर राजस्थान संघाला



हैदराबादच्या नव्या गोलंदाजांनी धावा करण्याची संधी दिली नाही. प्रफुल हिंगे व साकिब हुसैनच्या गोलंदाजीसमोर राजस्थान रॉयल्सचा संघ १५९ धावांवर सर्वबाद झाला. हैदराबादने दिलेल्या २१७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना राजस्थानच्या संघाने पहिल्याच षटकात गुडघे टेकले. प्रफुल हिंगने वैभव सूर्यवंशी, ध्रुव जुरेल व लुहान डे प्रिटोरियस यां तिघांना शून्यावर बाद केलं. यानंतर दुसऱ्या षटकात साकिब हुसैनने यशस्वी जैस्वालला एका धावेवर बाद केलं. यानंतर रियान पराग प्रफुल हिंगेचा बळी ठरला. यानंतर रवींद्र जडेजा व डोनावव फरेरा या जोडीने ७२ चेंडूत ११८ धावांची भागीदारी रचली. पण संघाला विजय मिळवून देऊ शकले नाहीत.डोनावर फरेरा ४४ चेंडूत ७ चौकार व ३ षटकारांसह ६९ धावा करत बाद झाला.

### राजस्थानचा १५९ धावांवर सर्वबाद

हैदराबादची सुरूवातदेखील खराब झाली. पहिल्याच चेंडूवर आर्चरने अभिषेक शर्माला झेलबाद केलं. यानंतर इशान किशनने ट्रॅव्हिस हेडच्या जोडीने संघाचा डाव सावरला. हेड १८ धावा करत बाद झाला. यानंतर क्लासेन व इशानने ३९ चेंडूत ८८ धावांची भागीदारी रचली. क्लासेन २६ चेंडूत १ चौकार व ३ षटकारांसह ४० धावांची खेळी केली. इशान किशनने ४४ चेंडूत ८ चौकार व ६ षटकारांसह ९१ धावांची मोठी खेळी केली.

# निळवंडे धरणाच्या उच्चस्तरीय कालव्यांना पाणी सोडणार!

जन सम्राट टाईम्स

**अकोले:** उच्चस्तरीय कालव्याच्या लाभक्षेत्रासाठी मंजूर पाणी २७४ दलघफू., आजपर्यंत पाणी वापरले जेमतेम ७०-७२ दलघफू. परंतु अधिकाऱ्यांनी पालकमंत्र्यांनी अहवाल दिला सर्व पाणी वापरल्याचा. त्यामुळे आता पाणी देता येणार नाही असे आज, सोमवारी अधिकाऱ्यांबरोबर झालेल्या चर्चेत उघड झाले आणि लाभधारक शेतकरी संतप्त झाले. त्यांनी निळवंडे धरणाचे उन्हाळी आवर्तन रोखण्याचा इशारा दिला. चूक लक्षात आल्यानंतर अधिकाऱ्यांनी निळवंडेच्या उच्चस्तरीय कालव्याला पाणी सोडण्याचे मान्य केले. केवळ अकोले तालुक्यासाठी असणाऱ्या निळवंडे धरणाच्या उच्चस्तरीय कालव्याना तीव्र उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर पाणी सोडावे व तालुक्याच्या हक्काचे पाणी मिळावे या मागणीसाठी लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांची बैठक आज येथील विश्रामगृहात झाली. उच्चस्तरीय कालव्यांसाठी २७४ दलघफु पाणी मंजूर आहे. हे मंजूर पाणी आजपर्यंत सोडले असून आता उच्चस्तरीय कालव्याना पाणी सोडता येणार नाही, असे जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी पालकमंत्र्यांना कळविले होते.

# काहीही झालं नाही तरीही मी माफी मागणार नाही

जन सम्राट टाईम्स

स्टँड अप कॉमेडियन कुणाल कामरा याने एकनाथ शिंदे यांची माफी मागण्यास मागच्या वर्षीही नकार दिला होता, आताही नकार दिला आहे. कुणाल कामरा हा त्याच्या बेधडक आणि बिनधास्त कॉमेडीसाठी प्रसिद्ध आहे. आत्तापर्यंत कुणाल कामराने अनेकदा अनेक नेत्यांची खिल्ली उडवली होती. दरम्यान मागील वर्षी मार्च महिन्यांत म्हणजेच साधारण १३ महिन्यांपूर्वी कुणाल कामराने महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची खिल्ली उडवली आणि त्यावरुन वाद निर्माण झाला. कुणाल कामराविरोधात हक्कभंग आणण्यात आला. तसंच कुणाल कामरा विरोधात एकनाथ शिंदेंची शिवसेना न्यायालयात गेली. कुणाल कामराने मात्र माफी मागणार नाही राजकीय व्यंग करण्याचा प्रत्येला अधिकार आहे असं म्हटलं आहे.मागच्या वर्षी मार्च महिन्यात कुणालने एक व्हिडीओ पोस्ट केला होता. 'नया भारत' असं त्या व्हिडीओचं नाव होतं. या व्हिडीओत त्याने 'भोली सी सुरत' या गाण्याच्या चालीवर थाने की रिक्षा, चेहरे पे दाढी असं म्हणत एक विडंबनात्मक गाणं सादर केलं.

# भेसळयुक्त कुल्फीचा साठा जप्त

जन सम्राट टाईम्स

**अहिल्यानगर:** अन्न व औषध प्रशासन विभागाच्या पथकाने आज, सोमवारी शहरातून भेसळयुक्त कुल्फीचा साठा विविध वितरकांकडून जप्त केला आहे. या कुल्फीमध्ये मनाई असणारे वनस्पती तेल (फॅट) वापरण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. अन्न व औषध प्रशासन विभागाने या संदर्भात उत्पादक कंपनी 'गुजरात को-ऑपरेटिव्ह मिल्क मार्केटिंग फेडरेशन' या कंपनीकडून खुलासा मागवला आहे तसेच नमुनेही घेण्यात आले आहेत.

अन्नसुरक्षा अधिकारी राजेश बडे यांनी ही माहिती दिली. गुजरात को-ऑपरेटिव्ह मिल्क मार्केटिंग फेडरेशन ही कंपनी 'अमुल' या नावाने उत्पादन बाजारात आणते. अन्नसुरक्षा व मानके कायद्यातील तरतुदीनुसार आईस्क्रीम कुल्फीमध्ये कोणत्याही प्रकारे वनस्पती तेल (फॅट) वापरण्यास मनाई करण्यात आलेली आहे. परंतु संबंधित कंपनीमार्फत 'अमुल' या नावाने उत्पादित होऊन पुरवठा होत असलेल्या अनेक प्रकारच्या कुल्फीमध्ये वनस्पती तेलाचा वापर होत असल्याचे निदर्शनास आले.

त्यानुसार अहिल्यानगर शहरातील अमुल कुल्फीचे वितरण करणाऱ्या आस्थापनामध्ये अन्न व सुरक्षा प्रशासनाने तपासणी केली व त्यानुसार अमुल ब्रँड कुल्फीचे नमुने घेऊन एकूण १८५६ पाकीटे कुल्फी (किंमत ५५ हजार ६८० रू.) भेसळयुक्त कुल्फीचा साठा जप्त केला.अन्न औषध प्रशासन विभागाचे सहाय्यक आयुक्त जी. व्ही. जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली अन्नसुरक्षा अधिकारी बडे व के. डी. जगदाळे यांच्या पथकाने ही कारवाई केली. जिल्ह्यातील अमुल नावाने उत्पादनाचे वितरण करणाऱ्या इतर आस्थापनामध्येही तपासणी करून कार्यवाही करणार असल्याचे अन्नसुरक्षा अधिकारी बडे यांनी सांगितले. अधिक माहिती देताना अन्नसुरक्षा अधिकारी बडे यांनी सांगितले की, 'फ्रोझन डेझर्ट'मध्ये खाद्यतेलाचा वापरास परवानगी असली तरी आईस्क्रीममध्ये खाद्यतेल वापरास परवानगी नाही. खाद्यतेलाच्या कुल्फीमधील वापरामुळे ट्रान्सफॅट वाढतात. ते कोलेस्ट्रॉलपेक्षाही घातक असतात. परंतु उत्पादक कंपन्या अनेकदा कुल्फीला घट्टपणा यावा, यासाठी खाद्यतेलांचा वापर करतात. अशी कुल्फी खाल्ली असता ती टाळूला चिकटते. यासाठी ग्राहकांनी कुल्फीच्या पाकिटावरील घटक वाचून कुल्फी खरेदी करावी. 'फ्रोझन डेझर्ट'मध्ये खाद्यतेलांच्या वापरामुळे त्याची गुणवत्ता कमी असते.






संपादकीय

# भारताचा पाया, माझा भीमराया..!

१४ एप्रिल हा दिवस भारतीय इतिहासातील अत्यंत अभिमानाचा आणि प्रेरणादायी दिवस. या दिवशी भारताला सामाजिक, राजकीय आणि बौद्धिक क्रांतीची दिशा देणाऱ्या महामानवाचा जन्म झाला. बाबासाहेब आंबेडकर. त्यांच्या 135 व्या जयंतीनिमित्त या थोर व्यक्तिमत्त्वाला कोटी कोटी प्रणाम आणि विनम्र अभिवादन!

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ एका समाजाचे नेते नव्हते, तर ते संपूर्ण मानवजातीसाठी समानता, स्वातंत्र्य आणि बंधुता यांचे जाज्वल्य प्रतीक होते. ज्या काळात भारतीय समाजात जातिभेद, अस्पृश्यता आणि अन्यायाची खोल मुळे रुजलेली होती, त्या काळात बाबासाहेबांनी या अन्यायाविरुद्ध उभा ठाकलेला आवाज म्हणजेच एक सामाजिक क्रांती होती.

### सामाजिक समतेसाठी लढलेला योद्धा




कर्मठ समाजातील काही अतिकर्मठ प्रवृत्ती माणसामाणसांत भेदभाव करत असताना, बाबासाहेबांनी या विषमतेला थेट आव्हान दिले. महाड सत्याग्रह हा त्यांचा संघर्षातील एक महत्त्वाचा टप्पा ठरला. महाड येथील चवदार तळे सर्वांसाठी खुले व्हावे, हा केवळ पाण्याचा प्रश्न नव्हता, तर तो मानवी हक्कांचा लढा होता. तसेच नाशिक येथील काळाराम मंदिर प्रवेश आंदोलनातून त्यांनी धार्मिक ठिकाणांवरही समानतेचा हक्क मिळवून देण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या या संघर्षांमुळे समाजातील वंचित घटकांना आपले हक्क मिळवण्याची प्रेरणा मिळाली.

### भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार

भारतीय लोकशाहीची पायाभरणी करताना बाबासाहेब आंबेडकर यांनी घेतलेले परिश्रम अतुलनीय आहेत. भारताच्या राज्यघटनेची निर्मिती करताना ते दिवसातून तब्बल १८ तास काम करत होते. त्यांनी तयार केलेली राज्यघटना ही केवळ कायद्यांचा संच नाही, तर ती सामाजिक न्यायाची हमी देणारी जीवनदृष्टी आहे. त्यांनी समाजातील सर्व घटकांना समान हक्क देणारी व्यवस्था उभी केली. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांवर आधारित राज्यघटना आजही भारताचा मार्गदर्शक दीपस्तंभ आहे.

### विशाल मनाचा महामानव

इतके संघर्ष करूनही बाबासाहेबांनी कधीही मनात द्वेष बाळगला नाही. महात्मा गांधी यांच्याबद्दल त्यांनी नेहमीच आदर ठेवला. दलितांसाठी स्वतंत्र मतदारसंघाच्या मुद्द्यावर त्यांनी अखेर सामंजस्याचा मार्ग स्वीकारला, हे त्यांच्या उच्च संस्कारांचे उदाहरण आहे. तसेच आचार्य अत्रे यांनी निर्माण केलेल्या 'ज्योतिबा फुले' चित्रपटाचे त्यांनी मुक्तकंठाने कौतुक केले. विचारभिन्नता असूनही इतरांच्या कार्याचा सन्मान करण्याची त्यांची वृत्ती ही आजच्या काळासाठी आदर्श आहे.

### ज्ञान, विचार आणि संस्कृतीचे जतन

पुण्यातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संग्राहलय हे ठिकाण बाबासाहेबांच्या कार्याची साक्ष देणारे आहे. येथे त्यांच्या जीवनाशी निगडित अनेक वस्तू, हस्तलिखिते आणि दुर्मिळ छायाचित्रे जतन करण्यात आली आहेत. हे संग्रहालय केवळ पाहण्यासारखे नसून, प्रेरणा देणारे आहे.

### अर्थशास्त्रातील योगदान आणि आरबीआय

बाबासाहेब केवळ समाजसुधारक नव्हते, तर ते एक उच्च दर्जाचे अर्थतज्ञही होते. 1926 साली ब्रिटिश सरकारने भारतीय चलन आणि आर्थिक व्यवस्थेसाठी HILTON YOUNG COMMISSION स्थापन केली. या आयोगाने बाबासाहेबांना साक्ष देण्यासाठी बोलावले. त्यांच्या "THE PROBLEM OF THE RUPEE" या ग्रंथातील विचारांनी ब्रिटिश सरकारला दिशा मिळाली. याच विचारांच्या आधारे 1 एप्रिल 1935 रोजी RESERVE BANK OF INDIA ची स्थापना करण्यात आली. हे त्यांच्या दूरदृष्टीचे आणि बौद्धिक सामर्थ्याचे प्रतीक आहे.

### "शिका, संघटित व्हा, संघर्ष करा"

हे विचार प्रत्येक युवकासाठी दिशादर्शक आहेत. आजच्या पिढीने बाबासाहेबांचे विचार आत्मसात करून समाजात सकारात्मक बदल घडवणे आवश्यक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ इतिहासातील व्यक्तिमत्त्व नाहीत, तर ते एक विचारधारा आहेत. त्यांनी दिलेली समानतेची शिकवण, न्यायासाठीची झुंज आणि ज्ञानाची कास धरण्याची प्रेरणा ही आजही तितकीच जिवंत आहे. "या भारताचा पाया, माझा भीमराया..!" हे वाक्य केवळ भावना नाही, तर एक सत्य आहे. त्यांनी घातलेल्या पायावर आजचा आधुनिक भारत उभा आहे.या महामानवास पुन्हा एकदा विनम्र अभिवादन— त्यांचे विचार जपूया, पुढे नेऊया आणि खऱ्या अर्थाने समतामूलक समाज घडवूया!

जय भिम!

Selected

## वीज बिलातील गोंधळ, गॅस पाईपलाईनची सक्ती थांबवा

मुंबई :वीज बिलातील कथित गोंधळ, वाढती दरवाढ आणि गॅस पाईपलाईनची सक्ती याविरोधात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आर.के.)ने आवाज उठवला आहे. पक्षाचे अध्यक्ष राजाराम खरात यांनी यासंदर्भात निवेदन देत शासनाने तातडीने हस्तक्षेप करून जनतेला दिलासा द्यावा, अशी मागणी केली आहे। निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी (महावितरण) कडून येणाऱ्या वीज बिलांमध्ये विविध आकारांची गुंतागुंत असल्याने सामान्य नागरिक हैराण होत आहेत. स्थिर आकार, वहन आकार, इंधन समायोजन, कर आणि इतर शुल्कांमुळे बिल समजणे कठीण होत असल्याची तक्रार करण्यात आली आहे. त्यामुळे वीज बिल साधे, स्पष्ट आणि पारदर्शक पद्धतीने देण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे। तसेच, जबरदस्तीने नवीन वीज मीटर बसविणे थांबवावे आणि ग्राहकांना त्याबाबत योग्य माहिती देऊनच निर्णय घ्यावा, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे।

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंतीनिमित्त राष्ट्रपती, पंतप्रधानांच्या शुभेच्छा!

## बाबासाहेबांचे जीवन राष्ट्रनिर्माणासाठी प्रेरणादायी : राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू

जन सम्राट टाईम्स



**नवी दिल्ली :** भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त (१४ एप्रिल) संपूर्ण देशात उत्साहाचे वातावरण आहे. या गौरवशाली प्रसंगी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह अनेक मान्यवरांनी देशवासियांना शुभेच्छा दिल्या असून, बाबासाहेबांच्या विचारांवर चालण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी जयंतीच्या पूर्वसंध्येला देशवासियांना शुभेच्छा देताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अतुलनीय योगदानाचे स्मरण केले. राष्ट्रपती म्हणाल्या की, प्रतिकूल परिस्थितीवर मात करून बाबासाहेबांनी मिळवलेले यश अफाट आहे. ते केवळ कायदेतज्ज्ञ किंवा अर्थतज्ज्ञ नव्हते, तर एक महान समाजसुधारकही होते. महिला आणि वंचितांच्या सामाजिक-आर्थिक हक्कांच्या संरक्षणासाठी त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला. त्यांनी दिलेला 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा मंत्र आजही तितकाच प्रभावी आहे.

* दौरा: राष्ट्रपती मंगळवारी (१४ एप्रिल) गांधीनगर येथील 'सामाजिक समरसता महोत्सवात' सहभागी होणार आहेत. विकसित भारतासाठी बाबासाहेबांचे आदर्श दिशादर्शक: पंतप्रधान नरेंद्र मोदी" पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स' च्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना कोटी-कोटी नमन केले. पंतप्रधान म्हणाले की, आज देश ज्या सामाजिक न्यायाच्या वाटेवर चालत आहे, ती केवळ बाबासाहेबांच्या प्रेरणेमुळेच शक्य झाली आहे. बाबासाहेबांचे सिद्धांत आणि आदर्श 'आत्मनिर्भर भारत' आणि 'विकसित भारत' घडवण्यासाठी देशाला नवी शक्ती आणि गती देत आहेत. )

उपराष्ट्रपती जगदीप धनखड: उपराष्ट्रपतींनी बाबासाहेबांना अभिवादन करताना म्हटले की, सामाजिक समता आणि न्याय ही लोकशाहीची मूळ तत्त्वे त्यांनीच आपल्याला दिली.

* लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला: ओम बिर्ला यांनीही संसदेत बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांना आदरांजली वाहिली. विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि मल्लिकार्जुन खर्गे यांनीही बाबासाहेबांच्या विचारांची आज देशाला सर्वाधिक गरज असल्याचे सांगत शुभेच्छा दिल्या.

### चैत्यभूमीवर भीमसागराचा उत्साह

मुंबईतील दादर येथील चैत्यभूमीवर बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी लाखो अनुयायांची गर्दी झाली आहे. मुंबई महानगरपालिका आणि पोलिसांनी सुरक्षेच्या दृष्टीने चोख बंदोबस्त ठेवला आहे. देशभरात या दिवशी सार्वजनिक सुटी जाहीर करण्यात आली असून, शाळा, महाविद्यालये आणि शासकीय कार्यालयांमध्ये विविध व्याख्याने आणि कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दाखवलेला समता, बंधुता आणि न्यायाचा मार्ग हेच खऱ्या अर्थाने आधुनिक भारताचे भविष्य आहे, हाच संदेश आज सर्व नेत्यांच्या शुभेच्छांमधून व्यक्त झाला.

जन सम्राट टाईम्स विशेष बातमी

# भारतीय राज्यघटना ही देशाचा अभिमान

## प्रा. विलास चव्हाण यांचे प्रतिपादन



जन सम्राट टाईम्स

**जळगाव :**जळगाव येथील डॉ. अण्णासाहेब जी. डी. बेंडाळे महिला महाविद्यालय (स्वायत्त) येथे समान संधी केंद्राच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या पूर्वसंध्येला आयोजित व्याख्यान कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात धुळे येथील प्रा. डॉ. विलास चव्हाण यांनी “अनंत पैलूंचा सामाजिक योद्धा डॉ. बाबासाहेब आंबेडकर” या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. के. नारखेडे होते. प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. आपल्या व्याख्यानात प्रा. विलास चव्हाण यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याला अभिवादन करत त्यांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित केले. “वंचितांच्या उन्नतीसाठी त्यांनी आयुष्य वेचले. समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यांवर आधारित त्यांचे विचार आजही समाजाला दिशादर्शक आहेत. भारतीय राज्यघटना ही देशाचा अभिमान असून तिच्या अंमलबजावणीमुळे नव्या भारताचा उदय झाला,” असे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या अभेद्य फाउंडेशनच्या अध्यक्षा वैशाली झाल्टे यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

### यांची होती उपस्थिती

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. नारखेडे यांनी डॉ. आंबेडकर यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकत त्यांच्या शिक्षणप्रेम, सामाजिक समतेसाठीचा संघर्ष आणि संविधान निर्मितीतील योगदानाचा सविस्तर आढावा घेतला. “शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा” हा त्यांचा संदेश आजच्या पिढीसाठी अत्यंत प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले. या कार्यक्रमाला प्रा. डॉ. व्ही. जे. पाटील, प्रा. डॉ. पी. एन. तायडे यांच्यासह प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राज्यात १५ ते ३० एप्रिल दरम्यान ‘पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जलव्यवस्थापन कृती पंधरवडा’

जन सम्राट टाईम्स

मुंबई: राज्याच्या जलसंपदा विभागामार्फत १५ ते ३० एप्रिल या कालावधीत राज्यभर ‘पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जलव्यवस्थापन कृती पंधरवडा-२०२६’ साजरा करण्यात येणार आहे.सिंचन व बिगरसिंचनाची कामे वेळेत पूर्ण करणे, विभागाच्या कामकाजाचा आढावा जनतेसमोर ठेवणे व उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सत्कार करणे हा यामागील मुख्य उद्देश आहे. या पंधरवड्याची सुरुवात व समारोप प्रत्येक जिल्हास्तरावर संबंधित जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांच्या हस्ते होणार आहे. या पंधरवड्यादरम्यान कालवा स्वच्छता मोहीम, पाणथळ जमीन मुक्त करण्यासाठी चर योजना, आधुनिक सिंचन पद्धतीद्वारे बंदिस्त नलिका प्रणालीत रूपांतर, पाणीपट्टी वसुली व शेतकऱ्यांच्या पाणी बिलांच्या तक्रारींचे निवारण यांवर विशेष भर दिला जाणार आहे. तसेच नदीतून गाळ काढणे, पाणी वापर संस्थांचे सक्षमीकरण, घरगुती, औद्योगिक व व्यावसायिक पाणी वापराचे जललेखापरीक्षण, धरण व लाभक्षेत्रातील अनधिकृत बांधकामे हटविणे व जलसंपदा विभागाच्या मालमत्तेची स्थळ निश्चिती करण्याची कामे प्राधान्याने केली जातील. जागतिक महिला शेतकरी वर्ष असल्याने कार्यक्रमांमध्ये महिलांचा जास्तीत जास्त सहभाग नोंदवण्याचे प्रयत्न केला जाणार आहे.पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्म त्रिशताब्दी वर्षानिमित्त २५ ते २९ एप्रिल दरम्यान गोदावरी-नर्मदा जल दिंडीचे आयोजन केले जाणार आहे. पंधरवड्यात दररोज विविध घटकांसाठी विशेष मोहिमा, उपक्रम व जलसंपदा अदालत आयोजित केली जाईल. यामध्ये अधिकारी प्रशिक्षण, जल पुनर्भरण, शेतकरी संवाद, भूसंपादन अडचणी निराकरण, कालवा संयुक्त पाहणी, नदी प्रदूषण नियंत्रण, कृषी विभागासोबत पीक पद्धतीबाबत कार्यशाळा, महसूल विभागाच्या मदतीने जमिनीचा सातबारा उतारा अद्ययावत करणे व आपत्ती व्यवस्थापन मार्गदर्शन अशा विविध विषयांवर भर दिला जाईल.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

# क्षणात होत्याचे नव्हते झाले !

## बुडून सख्ख्या भावांचा हृदयद्रावक अंत

जन सम्राट टाईम्स



**मुंबई :** राजगड तालुक्यातील घेवंडे येथे रविवारी घडलेल्या एका अत्यंत दुर्दैवी घटनेने संपूर्ण परिसर हळहळून गेला आहे. शेतात पिकांना पाणी देण्यासाठी कृषिपंप बसविताना विजेचा जबर धक्का बसून दोन सख्ख्या भावांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. या घटनेत निव्ही-घेवंडे समूह ग्रामपंचायतीचे माजी सरपंच दामाजी भाऊराव गायकवाड (वय 50) आणि त्यांचे बंधू दत्तात्रेय उर्फ दत्तू भाऊराव गायकवाड (वय 55) यांचा दुर्दैवी अंत झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दोघे भाऊ घेवंडे गावातील गुंजवणी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात शेतीसाठी कृषिपंप बसविण्याचे काम करत होते. दुपारच्या सुमारास मोटार दुरुस्ती सुरू असताना अचानक विद्युत प्रवाह आल्याने दोघांनाही जोरदार विजेचा धक्का बसला. या धक्क्यामुळे त्यांचा तोल जाऊन ते थेट खोल पाण्यात पडले आणि दुर्दैवाने त्यांचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच स्थानिक ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केले. वेल्हे पोलीस स्टेशनमार्फत हवेली आपत्ती व्यवस्थापन पथकाला पाचारण करण्यात आले. पोलीस अधिकारी अमित देशमुख, राजेंद्र आवदे, शुभम कव तसेच बचाव पथकातील सदस्य तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. सुमारे पाच तासांच्या अथक प्रयत्नांनंतर सायंकाळी अंदाजे 6.30 वाजता दामाजी गायकवाड यांचा मृतदेह शोधण्यात आला. मात्र, दत्तात्रेय गायकवाड यांचा मृतदेह रात्री उशिरापर्यंत सापडू शकला नाही.

### सर्वत्र हळहळ व्यक्त

अंधार पडल्यामुळे शोधमोहीम थांबवावी लागली असून सोमवारी सकाळी पुन्हा शोधकार्य सुरू करण्यात येणार आहे. या बचावकार्यात हवेली आपत्ती व्यवस्थापन पथकाचे अध्यक्ष तानाजी भोसले, गणेश सपकाळ (पोलीस पाटील), उत्तम पिसाळ, विक्रम बिरामने, संदीप सोलस्कर, संजय चोरघे, साजाधव आदींनी महत्त्वाची भूमिका बजावली.

# आरसीबीचा मुंबईवर १८ धावांनी दमदार विजय; सॉल्ट–पाटीदारचा झंझावात

जन सम्राट टाईम्स



मुंबई (गुरुदत्त वाकदेकर) : २०व्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने मुंबई इंडियन्सवर १८ धावांनी प्रभावी विजय मिळवत गुणतालिकेत आपले स्थान अधिक मजबूत केले. वानखेडे स्टेडियम, मुंबई येथे झालेल्या या धावांचा पाऊस पाडणाऱ्या सामन्यात आरसीबीने प्रथम फलंदाजी करत २० षटकांत २४०/४ धावांचा प्रचंड डोंगर उभा केला.प्रत्युत्तरात मुंबई इंडियन्सचा डाव २० षटकांत २२२/५ धावांवर थांबला. फिल सॉल्टच्या तडाखेबाज सुरुवातीने आणि रजत पाटीदारच्या वेगवान अर्धशतकाने सामन्याचा चेहरामोहरा पूर्णपणे बदलून टाकला. आरसीबीची सुरुवात अत्यंत आक्रमक झाली. फिल सॉल्टने अवघ्या ३६ चेंडूत ७८ धावांची स्फोटक खेळी साकारत मुंबईच्या वेगवान गोलंदाजांवर पहिल्यापासून दबाव आणला. चौकार-षटकारांचा पाऊस पाडत त्याने पॉवरप्लेमध्येच सामन्याचा सूर आरसीबीच्या बाजूने झुकवला. दुसऱ्या टोकाला कर्णधार रजत पाटीदारने २० चेंडूत ५३ धावांची झंझावाती खेळी करत वेग कायम ठेवला. सॉल्ट–पाटीदार यांची शतकी वेगवान भागीदारी हा डावाचा खरा पाया ठरली. याच भागीदारीमुळे आरसीबीने २४०/४ अशी या हंगामातील सर्वात दमदार धावसंख्यांपैकी एक उभारली. मुंबईकडून हार्दिक पंड्याने ४ षटकांत ३९ धावांत १ बळी घेत काहीसा प्रतिकार केला. मिशेल सॅन्टनरने मधल्या षटकांत नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला. मात्र सामन्याचा पहिला टर्निंग पॉइंट १५व्या षटकात दिसला. त्या षटकात आरसीबीने सलग मोठे फटके खेचत धावगती अचानक वाढवली. शेवटच्या पाच षटकांत उभारलेल्या अतिरिक्त ६० पेक्षा अधिक धावा अखेरीस निर्णायक ठरल्या. २४१ धावांच्या प्रचंड आव्हानाचा पाठलाग करताना मुंबईची सुरुवात अपेक्षेप्रमाणे वेगवान झाली नाही. काही विकेट्स झटपट गमावल्यानंतर शेर्फेन रदरफोर्डने अवघ्या ३१ चेंडूत ७१ धावांची तुफानी खेळी करत सामना पुन्हा रंगतदार केला. दुसऱ्या टोकाला हार्दिक पंड्याने २२ चेंडूत ४० धावा करत साथ दिली. रदरफोर्ड–हार्दिक यांची आक्रमक भागीदारी हा मुंबईच्या पुनरागमनाचा कणा ठरली. दोघांनी डेथ ओव्हर्सपूर्वी समीकरण पुन्हा जिवंत केले. सामन्याचा खरा टर्निंग पॉइंट १८व्या षटकात दिसला. त्या षटकात सुयश शर्माने अचूक लांबीवर मारा करत मुंबईचा वेग अचानक रोखला. त्याच्या ४ षटकांत ४७ धावांत २ बळी या स्पेलने मुंबईचा पाठलाग निर्णायक क्षणी विस्कळीत केला. १८व्या षटकातील किफायतशीर गोलंदाजीने मुंबईच्या विजयाच्या आशा जवळपास संपवल्या. त्या षटकामुळे सामना पूर्णपणे मुंबईच्या हातातून निसटला. शेवटच्या दोन षटकांत आवश्यक धावगती हाताबाहेर गेली आणि मुंबई २२२/५ पर्यंतच मजल मारू शकली. या सामन्यात अनेक महत्त्वाचे विक्रम नोंदले गेले. आरसीबीचा हा चार सामन्यांतील तिसरा विजय ठरला. २४०/४ ही धावसंख्या वानखेडेवरील या हंगामातील सर्वोच्च धावसंख्यांपैकी एक ठरली. फिल सॉल्टचे ३६ चेंडूत ७८ धावांचे अर्धशतक या मोसमातील सर्वात वेगवान प्रभावी डावांपैकी एक मानले जात आहे. मुंबई इंडियन्सचा सलग तिसरा पराभव त्यांच्या मोहिमेसाठी धोक्याची घंटा ठरला. या विजयाने रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा आत्मविश्वास आणखी उंचावला आहे.

# आदिवासी समस्यांवर तातडीची जिल्हास्तरीय बैठक घ्या :पालकमंत्री

## रोजगार व मूलभूत हक्कांबाबत ११ प्रमुख मुद्दे मांडले

जन सम्राट टाईम्स



जळगाव: आदिवासी समाजाच्या विविध गंभीर समस्यांकडे लक्ष वेधण्यासाठी आणि त्या तातडीने सोडविण्यासाठी जिल्हास्तरीय बैठक आयोजित करावी, अशी मागणी आदिवासी टायगर सेनेच्या वतीने करण्यात आली आहे. याबाबत १२ एप्रिल २०२६ रोजी पाडधी येथे पालकमंत्री तथा राज्याचे पाणीपुरवठा मंत्री Gulabrao Patil यांना सविस्तर निवेदन देण्यात आले. या निवेदनात आदिवासी समाजाच्या समस्या दिवसेंदिवस गंभीर होत असल्याचे नमूद करत जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव येथे पालकमंत्र्यांच्या उपस्थितीत सर्व संबंधित विभागांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची तातडीची बैठक घेण्याची मागणी करण्यात आली आहे.

आदिवासी टायगर सेनेने निवेदनात एकूण ११ महत्त्वाच्या मागण्या मांडल्या आहेत. त्यामध्ये आदिवासी वस्त्यांमध्ये दफनभूमी उपलब्ध करून देणे व सातबारा उतारा देणे, जन्मनोंदणी अभावी आधार कार्ड व अन्य कागदपत्रे मिळत नसल्याने विशेष मोहिम राबविणे, बंद पडलेली आदिवासी शबरी घरकुल योजना पुन्हा सुरू.

# गिल–बटलरची अर्धशतकी भागीदारी, प्रसिद्धचा भेदक मारा!

## गुजरातची लखनौवर ७ गडी राखून दणदणीत मात

जन सम्राट टाईम्स

मुंबई (गुरुदत्त वाकदेकर) : आयपीएल २०२६ मधील १९व्या सामन्यात गुजरात टायटन्सने लखनौ सुपर जायंट्सवर ७ गडी राखून प्रभावी विजय मिळवत गुणतालिकेत दमदार झेप घेतली. भारतरत्न श्री अटल बिहारी वाजपेयी इकाना क्रिकेट स्टेडियम, लखनौ येथे झालेल्या या सामन्यात लखनौने २० षटकांत १६४/८ धावा उभारल्या. प्रत्युत्तरात गुजरातने १८.४ षटकांत १६५/३ धावा करत ८ चेंडू राखून लक्ष्य गाठले. शुबमन गिल आणि जोस बटलर यांच्या अर्धशतकी खेळींसह प्रसिद्ध कृष्णाच्या भेदक गोलंदाजीने सामन्याचा चेहरामोहरा बदलून टाकला. लखनौची सुरुवात सावध झाली. एडन मार्करमने २१ चेंडूत ३० धावा करत डावाला गती देण्याचा प्रयत्न केला. मात्र दुसऱ्या टोकाला विकेट्स नियमित पडत राहिल्याने मोठी भागीदारी उभी राहू शकली नाही. निकोलस पूरनला अपेक्षित मोठी खेळी करता आली नाही. मधल्या षटकांत प्रसिद्ध कृष्णाने अचूक टप्प्यावर मारा करत लखनौच्या फलंदाजीचा कणा मोडला. मार्करमसह मधल्या फळीतील महत्त्वाच्या विकेट्स घेत त्याने धावगतीवर प्रभावी नियंत्रण ठेवले. परिणामी लखनौ १६४/८ पर्यंतच मजल मारू शकला. गुजरातकडून प्रसिद्ध कृष्णाने ४ षटकांत २८ धावांत ४ बळी घेत सामन्याचा पहिला टर्निंग पॉइंट घडवला. त्याच्या या स्पेलमुळे लखनौ १८० च्या दिशेने जाण्यापासून रोखला गेला. अशोक शर्माने २ बळी घेत दुसऱ्या टोकाने प्रभावी साथ दिली. पॉवरप्लेनंतर लखनौला मोठे फटके खेळता न आल्याने शेवटच्या षटकांत दबाव वाढत गेला. १६५ धावांच्या पाठलागात गुजरातची सुरुवात आत्मविश्वासपूर्ण झाली. कर्णधार शुबमन गिलने ४० चेंडूत ५६ धावांची संयमी पण प्रभावी खेळी साकारली. दुसऱ्या टोकाला जोस बटलरने ३७ चेंडूत ६० धावांची झंझावाती खेळी करत लखनौच्या गोलंदाजांवर सातत्याने दबाव ठेवला. गिल–बटलर यांची अर्धशतकी भागीदारी हा विजयाचा खरा पाया ठरली. दोघांनी पॉवरप्लेनंतर फिरकीवर अचूक हल्ला चढवत आवश्यक धावगती पूर्णपणे गुजरातच्या नियंत्रणात ठेवली. सामन्याचा खरा टर्निंग पॉइंट १४व्या षटकात दिसला. त्या षटकात बटलरने सलग दोन चौकार आणि एक षटकार खेचत लखनौच्या हातातील नियंत्रण पूर्णपणे हिसकावून घेतले. त्या एका षटकानंतर विजयाचे पारडे स्पष्टपणे गुजरातच्या बाजूला झुकले. शेवटी वॉशिंग्टन सुंदरने १३ चेंडूत २१ नाबाद धावा करत डावाला शांत फिनिश दिला. गुजरातने १८.४ षटकांत १६५/३ धावा करत ७ गडी राखून सामना जिंकला. लखनौकडून प्रिन्स यादव आणि दिग्वेश राठी यांनी प्रत्येकी १ बळी घेत प्रतिकार केला. मात्र गिल–बटलरसमोर त्यांचा प्रभाव मर्यादित राहिला. डेथ ओव्हर्सपूर्वीच सामना संपल्याने लखनौच्या गोलंदाजीतील अंमलबजावणीतील उणिवा पुन्हा समोर आल्या. या सामन्यात अनेक महत्त्वाचे विक्रम नोंदले गेले.



### गुजरातनेगुणतालिकेत पाचव्या स्थानावर झेप घेतली

गुजरात टायटन्सने सलग दुसरा विजय मिळवत गुणतालिकेत पाचव्या स्थानावर झेप घेतली. प्रसिद्ध कृष्णाचे ४/२८ हे या हंगामातील गुजरातकडून सर्वोत्तम गोलंदाजी प्रदर्शनांपैकी एक ठरले. लखनौचा मधल्या षटकांतील संथ वेग त्यांच्या पराभवाचे मुख्य कारण ठरला. या विजयाने गुजरात टायटन्सचा आत्मविश्वास आणखी उंचावला आहे, स्पर्धेतील पुढील सामन्यांसाठी हा निकाल रणनीतीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची पार्श्वभूमी ठरणार आहे.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

# राज्यात 2.21 लाख अंगणवाडी पदांची मेगा भरती

## २३ वर्षांनंतर महिला व बाल विकास विभागात मोठा बदल

जन सम्राट टाईम्स



मुंबई : राज्यातील महिलांसाठी मोठी आनंदाची बातमी समोर आली असून, महिला व बाल विकास विभागात तब्बल 2 लाख 21 हजार 328 पदांची मेगा भरती होणार आहे. अंगणवाडी सेविका आणि मदतनीस पदांसाठी ही भरती होणार असल्याने महिलांसाठी ही रोजगाराची मोठी संधी ठरणार आहे. महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिलेल्या माहितीनुसार, तब्बल २३ वर्षांनंतर विभागाच्या रचनेत मोठा बदल करण्यात आला आहे. ११ मार्च २०२६ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत सुधारित आकृतीबंधाला मंजुरी देण्यात आली असून, त्यानुसार शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. या निर्णयानुसार, विभागातील गट-अ ते गट-ड मधील एकूण ८,६६९ नियमित पदांना मान्यता देण्यात आली आहे. याशिवाय २,८४३ पदे बाह्ययंत्रणेमार्फत भरण्यासही मंजुरी देण्यात आली आहे. विशेष म्हणजे, एकात्मिक बाल विकास सेवा (ICDS) योजनेअंतर्गत १,१०,६६४ अंगणवाडी सेविका आणि १,१०,६६४ अंगणवाडी मदतनीस अशा एकूण २,२१,३२८ मानधनाधारित पदांना हिरवा कंदील देण्यात आला आहे. बदलत्या गरजांचा विचार करून काही जुनी पदे रद्द करण्यात आली असून १६५ नव्या पदांची भरही घालण्यात आली आहे.

### सकीय योजनांना नवी गती मिळणार

मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले की, “हा निर्णय विभागाच्या सक्षमीकरणासाठी महत्त्वाचा टप्पा आहे. यामुळे महिला व बालकल्याण योजनांची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे होईल.” सन २००३ पासून प्रलंबित असलेला हा विषय मार्गी लागल्याने ग्रामीण व शहरी भागातील महिलांसाठी आणि बालकांसाठीच्या शासकीय योजनांना नवी गती मिळणार आहे. या निर्णयामुळे वंचित घटकांपर्यंत योजना पोहोचवण्यास मदत होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.